दैनिक साप्ताहिक आपल्या सर्वांचे लोकप्रिय वृत्तपत्र

# अक्षर वार्ता

अक्षर वार्ता PRESS

संपादक - संजय आ.हंगे
मो.९७६६२६८४१५

DAINIK AKSHAR VARTA

कार्यकारी संपादक - सुमन डापकर
मो.८७८८२५१११४

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

बीड (महाराष्ट्र) वर्ष ४ थे, अंक २५३ शनिवार दिनांक २६ एप्रिल २०२५ RNI Reg.NO./2021/83381 E-mail : aksharwartanews@gmail.com पृष्ठे : ४ किंमत २ रुपये

BEED (MAHARASHTRA) Year 4 Issue 253 saturaday Dt 26 April 2025 RNI Reg. NO./2021/83381 daily Marathi E-mail : akasharwartanews@gmail.com Pages 4 Prise Rs.2

# भारताशी पंगा घेऊ नका;मोदी सरकारचे पाकिस्तानला निर्वाणीचा इशारा अन् प्रत्युत्तर!


नवी दिल्ली (वृत्तसेवा):- इतिहासात प्रथमच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, भारताने पहलगाममधील भयंकर दहशतवादी हल्ल्याला धाडसी, व्यापक आणि जबरदस्त प्रत्युत्तर दिले आहे, ज्यात २६ निष्पाप लोकांचा बळी गेला आहे. सरकारने केलेल्या सात कठोर आणि जलद कृती पाकिस्तानला स्पष्ट संदेश देतात: यामध्ये शांतता ही भारतीयांच्या जीवावर बेतली जाणार नाही उलट दहशतवादाचा बदला घेतला जाईल.अनेक दशकांपासून, सीमापार दहशतवादाच्या कृत्यांबद्दल भारताची प्रतिक्रिया राजनैतिक विधाने आणि प्रतिकात्मक हावभावांपुरती मर्यादित होती. आता ही स्थिती नाही. हा नवा भारत आहे - निर्णायक, धाडसी आणि दृढनिश्चयी आहे. जम्मू-काश्मीरच्या बैसरन खोऱ्यातील रक्तपाताच्या पार्श्वभूमीवर केंद्राने अशी कारवाई केली आहे, जी स्वातंत्र्यानंतर इतिहासात आजपर्यंत झाली नाही. पंतप्रधान मोदींनी देशाला संबोधित करताना 'या' घोषणा केल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, आम्ही प्रत्येक दहशतवादी, त्यांचे हस्तक आणि समर्थकांना शोधू, त्यांचा माग काढू आणि त्यांना धडा शिकवू. आम्ही त्यांचा पृथ्वीच्या टोकापर्यंत पाठलाग करू. सात प्रति-हल्ले ज्यामुळे भारतीय मुत्सद्देगिरी आणि संरक्षणाची पुन्हा व्याख्या केली सिंधू जल कराराचे निलंबन अनेक दशकांच्या स्थितीतील नाट्यमय बदलात, भारताने १९६० च्या सिंधू जल कराराला स्थगिती दिली आणि हे स्पष्ट केले की जोपर्यंत दहशतवाद अव्याहतपणे चालू आहे तोपर्यंत शांतता आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही.



हे केवळ राजकीय विधान नाही - हे भारताच्या परराष्ट्र धोरणातील एक मोठे बदल आहे. पाकिस्तानी लष्करी अधिकाऱ्यांची हकालपट्टी भारताने तीन वरिष्ठ पाकिस्तानी लष्करी अधिकाऱ्यांची हकालपट्टी केली आहे आणि पाकिस्तानने आपल्या राजनैतिक कर्मचाऱ्यांची सुमारे ४५ टक्के कपात करण्याची मागणी केली आहे. हा प्रतिकात्मक पण परिणामकारक निर्णय भारताचा संदेश अधोरेखित करतो. दहशतवादाला प्रोत्साहन देताना तुम्ही मुत्सद्देगिरीची अपेक्षा करू शकत नाही. सार्क व्हिसा सूट रद्द करणे भारताने पाकिस्तानी नागरिकांसाठी सार्क व्हिसा सूट योजना संपवली आहे आणि सध्या देशात असलेल्यांना देश सोडण्यासाठी ४८ तासांचा अवधी दिला आहे. नवा भारत दहशतवादाला पोसणाऱ्या देशातील नागरिकांना आश्रय देत नाही. अटारी चेक पोस्ट बंद पंजाबमधील अटारी येथे एकमेव कार्यक्षम जमीन सीमा ओलांडणे बंद करणे हा एक शक्तिशाली संकेत आहे-आर्थिक, सामाजिक आणि राजनैतिक संबंधांची किंमत आहे आणि ती किंमत शांतताच आहे. पूर्ण व्हिसा बंदी आणि विद्यमान व्हिसा रद्द करणे भारताने पाकिस्तानी नागरिकांसाठी सर्व व्हिसा सेवा निलंबित केल्या आहेत आणि वैद्यकीय कारणास्तव मंजूर केलेले सर्व व्हिसा रद्द केले आहेत.

### महाराष्ट्र सरकारचा मोठा निर्णय!

## नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होणार जूनपासून



मुंबई : महाराष्ट्र सरकारने जून २०२५ पासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून शाळांमध्ये नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याची घोषणा केली आहे. या नवीन धोरणामुळे राज्याच्या शिक्षण व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल घडून येतील. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये अभ्यासक्रमाची चार स्तरांमध्ये विभाजन करणारी एक नवीन अभ्यासक्रम रचना करण्यात आली असून जून २०२५ पासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षात पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी नवा अभ्यासक्रम लागू होणार आहे. हा निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने जाहीर केला असून, शिक्षणाच्या पद्धतीत आणि रचनेत मोठा बदल अपेक्षित आहे.

अभ्यासक्रमाची चार स्तरांमध्ये विभाजन करणारी एक नवीन अभ्यासक्रम रचना आखण्यात आली असून यात पायाभूत, पूर्वतयारी, पूर्व माध्यमिक आणि माध्यमिक हे टप्पे वयोगटानुसार ठरवले गेले आहेत. प्रत्येक पान २ वर...

## बीडमध्ये दोन गटांत दगडफेक

### वारंवार गुन्हेगारीचे प्रकार पोलिस तैनात, अनेक जखमी

आष्टी (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यातील आष्टी या गावात दोन गट आपसात भिडल्या मुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या दरम्यान गावातील सुमारे २०० ते ३०० तरुणांनी रस्त्यावर एकमेकांच्या दिशेने जोरदार दगडफेक केली. तर काहींनी हातात लाकडी दांडे आणि शस्त्र घेऊन दहशत माजवण्याचा प्रकार घडला आहे. बीड जिल्ह्यात गुन्हेगारीच्या घटना वारंवार समोर येत असतात. त्यातच संतोष हत्या प्रकरण आणि खोक्या प्रकरण ताजे असतानाच आता बीड जिल्ह्यातील आष्टी गावात दोन गट परस्परांशी भिडले असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे महाराष्ट्रात बीड



ची ओळख आता गुन्हेगारी जिल्हा म्हणून होताना दिसत आहे.


दगडफेकीत गावातील नागरिक जखमी

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार आष्टीच्या खडकत गावामध्ये एका चौकात झेंडा लावण्यावरून हा वाद सुरू झाला. हा वाद अति टोकाला पोहोचल्यानंतर दोन गटामध्ये मोठ्या प्रमाणात दगडफेक देखील झाली. दोन्ही बाजूने झालेल्या दगडफेकीत गावातील नागरिक जखमी झाले आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात तणाव निर्माण झाला होता. अखेर पोलिस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. सध्या या गावात मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला असून गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## अमित शहांनी मुख्यमंत्र्यांना केलं सतर्क म्हणाले, एकही पाकिस्तानी..,

नवी दिल्ली (वृत्तसेवा):- पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने कठोर पावले उचलली आहेत. सिंधू पाणीवाटप करार रद्द करण्याबरोबच पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसाची वैधता समाप्त करण्यात आली आहे.

या नागरिकांना २७ एप्रिलपूर्वी देश सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यातून हिंदू पाकिस्तानी नागरिकांना वगळण्यात आले आहे. त्यानंतर आता केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शुक्रवारी देशभरातील मुख्यमंत्र्यांना सतर्क केले आहे. अमित शाह यांनी देशातील मुख्यमंत्र्यांशी संवाद साधला आहे. पाकिस्तानी नागरिकांना देश



सोडण्याचे आदेश केंद्र सरकारने दिले आहे. देशभरातील अनेक राज्यांमध्ये पाकिस्तानी नागरिक आहेत. त्या प्रत्येकाचा शोध घेऊन त्यांना पाकिस्तानात परत पाठविण्यात यावे, अशा सूचना शहांनी सर्व मुख्यमंत्र्यांना दिल्या आहेत. एकही पाकिस्तानी नागरिक भारतात राहू नये, असे शहांनी राज्यांना सतर्क केले आहे. भारताकडून पाकिस्तानविरोधात कडक पावले उचलली जात आहेत. त्याचाच भाग म्हणून पाकिस्तानी नागरिकांचा व्हिसा रद्द करण्यात आला आहे. त्यांना देश सोडण्यासाठी २७ एप्रिलपर्यंत मुदत देण्यात आली आहे. तसेच विशेष व्हिसाअंतर्गत भारतात आलेल्या पाकिस्तानी नागरिकांनाही ४८ तासांत देश सोडण्याचे पान २ वर...

## केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत बीड जिल्हा चमकला !

बीड (प्रतिनिधी):- आयोगाच्या परीक्षेत बीड जिल्ह्याच्या



भूमिपुत्रांनी चमकदार कामगिरी केली असून यशस्वी विद्यार्थ्यांचे राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी अभिनंदन केले आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परिक्षेचा नुकताच निकाल जाहीर झाला, यात जिल्ह्यातील भूमिपुत्रांनी दैदीप्यमान असे यश मिळवले, याबद्दल ना. पंकजाताई मुंडे यांनी आनंद व्यक्त केला आहे. परळी तालुक्यातील पांगरी (गोपीनाथगड) येथील अक्षय संभाजी मुंडे व पाटोदा तालुक्यातील डॉ. पंकज आवटे व बीड येथील डॉ सुशील गिते यांनी दैदिप्यमान यश संपादित करत घवघवीत यश मिळवले आहे. राष्ट्रीय स्तरावर आपल्या जिल्ह्याची मान उंचावणारे तुमचे हे यश आम्हा सर्वांसाठी अभिमानाची पान २ वर...

## देशातील हवामानात मोठा बदल

### 'या' राज्यांना दिला अतिवृष्टीसह वादळाचा इशारा



मुंबई : देशात पुन्हा एकदा वातावरणात मोठा बदल झाला आहे. एकीकडे देशातील अनेक भागांना उष्णतेच्या लाटेचा तडाखा बसत आहे, तर दुसरीकडे २३ राज्यांना अतिवृष्टी आणि वादळाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय हवामान विभागाकडून हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

उत्तर आणि पश्चिम भारतामध्ये जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे जम्मू-कश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड या पान २ वर...

## जामखेडमधील वस्तीगृहात रॅगिंग

जामखेड (प्रतिनिधी):- रॅगिंग ने राज्याला नव्हे देशाला मोठे नुकसान सहन करावे लागले आहे. सरकारने कायदा कडक केल्याने दरम्यान थांबलेली रॅगिंग पून्हा चालू झाली असल्याचे जामखेड येथील घटनेने खळबळ उडाली आहे. अनुसूचित जाती-जमाती, नवबौद्ध मुलांच्या निवासी शाळेत रॅगिंग चा भयंकर प्रकार समोर आला आला आहे. ८ वी तील विद्यार्थ्यांना ९ वी तील विद्यार्थी बेल्टने, लाथाबुक्क्यांने जबर मारहाण करतानाचा व्हिडीओ समाजमाध्यमावर व्हायरल झाल्यानंतर प्रशासनाला जाग आली. पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी आपल्या सहकाऱ्यांसह. घटनास्थळी धाव घेतली व घटनेची माहिती घेतली. अनुसूचित जाती-जमाती आणि नवबौद्ध मुलांच्या निवासी शाळेत मानवतेचा अंत होत आहे!



## छत्तीसगडमध्ये चकमक, ७ नक्षलवाद्यांचा खात्मा

### पोलिस, कोब्रा, राखीव दलाची संयुक्त कारवाई

बिजापूर (वृत्तसंस्था):- छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यातील करेगुट्टा जंगल परिसरात सुरक्षा जवान आणि नक्षल्यांत जोरदार चकमक सुरू असून, आतापर्यंत झालेल्या चकमकीत ७ नक्षल्यांचा खात्मा करण्यात आला. घटनास्थळी सुमारे १ हजार नक्षलवादी उपस्थित असल्याची माहिती समोर आली आहे. या नक्षल्यांना आता १० हजार सुरक्षा जवानांनी घेरले आहे. त्यामुळे



ही सर्वांत मोठी कारवाई मानली जात आहे. जिल्हा राखीव रक्षक दल, बस्तर फायटर्स, विशेष टास्क फोर्स, राज्य पोलीस दल, केंद्रीय राखीव पोलीस दल आणि कोब्रा बटालियन यांच्या संयुक्त पथकाने ही कारवाई सुरू केली असून, गुप्तचर माहितीच्या आधारे ही मोहीम आखण्यात आली. बिजापूर जिल्ह्यातील उसूर पोलिस ठाणे क्षेत्रातील गलगम-नडपल्ली परिसरातील पान २ वर...

CMYK

## संपादकीय...

### ‘राग’ येऊ द्या, पण आपल्याच पायावर कुऱ्हाड मारू नका; पर्यटनस्थळी जागता पाहारा का नाही?

मी गेली २८ वर्ष काश्मीरमध्ये आहे. इथे येतो. राहतो. काम करतो. इथल्या माणसांना भेटतो. त्यांच्यातलाच आहे आता मी. या २८ वर्षांत काश्मीरही खूप झपाट्याने बदललं. हे बदल सकारात्मक आणि म्हणूनच दिलासादायक आहेत. मी कामाला सुरुवात केली ती कुपवाडा जिल्ह्यातून. हा जिल्हा दहशतवादाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जायचा. स्थानिक भाषेत ‘अँटी इंडिया’ ! पण आता चित्र बदललंय. देशात सर्वाधिक ९५ टक्के मतदान होतं तिथे. पूर्वी इथल्या लोकांचा भारत सरकारवर प्रचंड राग होता, आज तसं नाही. काश्मीरमध्ये पर्यटनाचा ओघ वाढला तसा उर्वरित भारताशी आणि मुख्य म्हणजे भारतीयांशी दीर्घकाळाने काश्मिरींचा प्रत्यक्ष संपर्क आला. ही सगळी माणसं आपल्या भल्याचा विचार करणारी आहेत, आपल्या विरोधात नाहीत हे या संपर्कामुळेच काश्मिरींना कळलं आणि काश्मिरींचा त्या सगळ्यांशी एक भावबंध निर्माण झाला. त्यातूनच आज ‘अँटी इंडिया’ ते ‘अँटी टेररिझम’ हा प्रवास झाला हे आपल्याला नाकारता येणार नाही.

पहलगाममध्ये पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यावर सर्व स्तरांतून येणारी प्रतिक्रिया संमिश्र आहे. अर्थात, तशी ती असणं फार अनपेक्षित नाही. काश्मीरमधले लोक श्रीमंत आहेत, त्यांना पर्यटनातून मिळणारे पैसे मिळाले नाहीत म्हणून काही फरक पडत नाही वगैरे चर्चा कानावर येत आहेत. पण त्यात तथ्य नाही. पुण्यामुंबईत माणूस रस्त्यावर झोपू शकतो. काश्मीरमध्ये जिवंत राहायचं असेल तर डोक्यावर छप्पर असणं अत्यावश्यक आहे. पण डोक्यावर छप्पर आहे म्हणून ते श्रीमंत आहेत असा निष्कर्ष काढणं चुकीचं आहे.

काश्मीरमध्ये वर्षानुवर्ष होत आलेल्या भारत विरोधी कारवायांमध्ये मूठभर स्थानिकांचा सहभाग असेल; पण त्यामुळे सर्वच्या सर्व काश्मिरी भारतविरोधी हा अर्थ काढणंही तितकंच चुकीचं आहे. धर्माच्या आधारावर निर्माण झालेले देश हे भारतासारख्या सर्वधर्मसमभाव आचरणात आणत असलेल्या देशाविरोधात खार खाऊन असणार हे उघड आहे. त्यामुळे आपल्याला रक्तबंबाळ करण्याचे प्रयत्न सुरू राहणारच आहेत, त्याला उत्तर देण्यासाठी काश्मिरी किंवा मुसलमान हे निकष असू शकत नाहीत, हे ओळखणं आणि देशवासीयांनीही तसं जबाबदार वर्तन करणं महत्त्वाचं आहे, याची जाणीव आपण ठेवायला हवी. काश्मीरमध्ये पर्यटक येतात. पण इथल्या पर्यटनावर कुणाचंही नियंत्रण नाही. मुंबई-पुण्यासारख्या शहरात एखाद्या मोठ्या रस्त्यावर किती तरी सीसीटीव्ही कॅमेरे असतात. पहलगाममध्ये लाखो पर्यटक येतात; पण तिथे असा कुठला जागता पाहारा आहे? तो का नाही? - असे प्रश्न पर्यटकांना पडायला हवेत. पर्यटनावर पोट असलेल्या स्थानिक काश्मिरींना पडायला हवेत. ते विचारले जात नाहीत तोपर्यंत हे चित्र बदलण्यास सुरुवात होणार नाही. पहलगामच्या घटनेचे परिणाम दूरगामी असतील. मुस्लिमांना लक्ष्य केलं जाईल, त्यांच्या देशनिष्ठेबद्दल शंका घेतल्या जातील, पण ते योग्य आहे का याचा सारासार विचार करायची वेळ आली आहे. पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याबद्दल राग असायलाच हवा, पण त्या रागाचं पर्यावसान धर्मयुद्धात होता कामा नये. ते तसं होत असेल तर आपण आपल्याच पायावर कुऱ्हाड मारून घेतोय हे लक्षात ठेवायला हवं. बहुसंख्य काश्मिरींना ते आता कळलं आहे. आपल्यालाही ते जितकं लवकर कळेल तेवढं सगळ्यांच्या हिताचं असेल. १९९६-९७ पासून काश्मीरचा ‘भारत विरोधी ते दहशतवाद विरोधी’ असा झालेला प्रवास मी स्वतः जवळून पाहिला आहे. माणसे, त्यांचे विचार बदलत जाताना अनुभवले आहे. एक प्रसंग आठवतो. २०१६-१७ चा काळ. बुरहान वाणीच्या काळात काश्मीरातील पॅलेट गनच्या हल्ल्यांमध्ये किती तरी तरुण मुलांचे डोळे गेले. वयाच्या जेमतेम विशीत ही तरुण मुलं कायमस्वरूपी अंध झाली. डोळ्यांचं अंधपण आणि द्वेषातून आलेलं आंधळेपण यातून ते तरुण आयुष्यभर संतापाने धुमसत राहिले असते. त्याचे दुष्परिणाम या ना त्या प्रकारे झालेच असते. या मुलांचं अंधत्व दूर करण्यासाठी आम्ही देशाच्या कानाकोपऱ्यातून डॉक्टरांच्या तुकड्या काश्मीरमध्ये आणल्या होत्या. त्या तरुण मुलांवर शस्त्रक्रिया केल्या गेल्या. त्यांना नवी दृष्टी मिळाली. हाच प्रयोग आता देशभरात व्हायला हवा आहे. गेली काही वर्षे समाज म्हणून आपण आंधळे झालो आहोत. त्या आंधळेपणावर आता तातडीने शस्त्रक्रिया करण्याची गरज आहे, तरच आपली दृष्टी बदलेल आणि नवा प्रकाश दिसेल !

मी गेली २८ वर्ष काश्मीरमध्ये आहे. इथे येतो. राहतो. काम करतो. इथल्या माणसांना भेटतो. त्यांच्यातलाच आहे आता मी. या २८ वर्षांत काश्मीरही खूप झपाट्याने बदललं. हे बदल सकारात्मक आणि म्हणूनच दिलासादायक आहेत. मी कामाला सुरुवात केली ती कुपवाडा जिल्ह्यातून. हा जिल्हा दहशतवादाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जायचा. स्थानिक भाषेत ‘अँटी इंडिया’ ! पण आता चित्र बदललंय. देशात सर्वाधिक ९५ टक्के मतदान होतं तिथे. पूर्वी इथल्या लोकांचा भारत सरकारवर प्रचंड राग होता, आज तसं नाही. काश्मीरमध्ये पर्यटनाचा ओघ वाढला तसा उर्वरित भारताशी आणि मुख्य म्हणजे भारतीयांशी दीर्घकाळाने काश्मिरींचा प्रत्यक्ष संपर्क आला. ही सगळी माणसं आपल्या भल्याचा विचार करणारी आहेत, आपल्या विरोधात नाहीत हे या संपर्कामुळेच काश्मिरींना कळलं आणि काश्मिरींचा त्या सगळ्यांशी एक भावबंध निर्माण झाला. त्यातूनच आज ‘अँटी इंडिया’ ते ‘अँटी टेररिझम’ हा प्रवास झाला हे आपल्याला नाकारता येणार नाही.

# कितीही पौष्टिक असले तरी 'हा' त्रास असणाऱ्यांनी मखाना खाऊ नये

## आहारतज्ज्ञ सांगतात मखाना खाण्यासाठी...

लोकांना कॉन्स्टीपेशनचा त्रास असतो, अशा व्यक्तींनी मखाना खाणं टाळायला हवं. कारण ... मखाना हा पदार्थ आता सध्या खूप ट्रेण्डिंग झाला आहे. साधारण ५ ते ६ वर्षांपुर्वीसुद्धा मखान्यांना एवढी लोकप्रियता मिळालेली नव्हती. पण आता मात्र सुपरफूड म्हणून मखाने ओळखले जातात. एवढंच नाही तर पंतप्रधान मोंदीनीही एकदा त्यांच्या भाषणातून नियमितपणे मखाना खाण्याचे महत्त्व समजावून सांगितले होते. उपवासालाही चालणारा मखाना खरोखरच अतिशय आरोग्यदायी आहे. मखान्यांमध्ये प्रोटीन्स, चांगले फॅट्स योग्य प्रमाणात असतात. कॅलरी खूप कमी असतात. याशिवाय त्यातून कॅल्शियमही भरपूर प्रमाणात मिळते. संध्याकाळी स्नॅक्समध्ये किंवा सकाळी नाश्त्यामध्ये तर अनेक जण आवर्जून मखाना खातातच पण असं सगळं असलं तरी काही लोकांनी मात्र मखाना खाणं टाळायला हवं



किंवा ते खूप कमी प्रमाणात खायला हवे. याविषयीची माहिती आहारतज्ज्ञांनी दिली आहे.

मखाना खाणं कोणी टाळायला हवं? मखाना खाणं कोणत्या व्यक्तींसाठी त्रासदायक ठरू शकतं, याविषयीची आहारतज्ज्ञ श्वेता शाह यांनी दिलेली माहिती एनडीटीव्हीने प्रकाशित केली आहे. त्यानुसार... ह्वरोपांना फुलंच येईना? फक्त १ चमचा चहा पावडरचा उपाय करा- ८ दिवसांत येतील भरपूर फुलं १. ज्या लोकांना कॉन्स्टीपेशनचा त्रास असतो, अशा व्यक्तींनी मखाना खाणं टाळायला हवं. कारण मखान्यांमध्ये असे काही गुणधर्म असतात ज्यामुळे बद्धकोष्ठतेचा त्रास वाढू शकतो. अशा लोकांनी मखाना खायचेच असतील तर ते खूप कमी प्रमाणात खावे. २. मखान्यांमध्ये फायबर आणि कार्बोहायड्रेट्स भरपूर प्रमाणात असतात. त्यामुळे बऱ्याचदा ते पचायला वेळ लागत असल्याने पचनक्रियेदरम्यान फर्मेंट होऊन सिडीटीचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे ज्या लोकांना सिडीटीचा त्रास असतो, त्यांनी मखाना खाणं टाळायला हवं. उन्हामुळे खूप टॅनिंग झालं? किचनमधले ’हे’ पदार्थ एकत्र करून चेहऱ्यावर चोळा- त्वचा उजळून चमकेल ३. कफ प्रकृती असणाऱ्या लोकांनीही मखाना खाणं टाळायला हवं. कारण त्यामुळे त्यांचा कफ वाढू शकतो. ४. वरील प्रकारचा त्रास असणाऱ्या व्यक्तींनी मखाना खाऊ नये, असं आहारतज्ज्ञ सांगतात. पण जर तुम्हाला मखाना खूपच आवडत असतील आणि ते खाण्याची इच्छा तीव्र असेल तर मखाना खीर, तुपात भाजलेले मखाना या पद्धतीने ते अगदी मर्यादित प्रमाणात खावे.




# गोल्ड लोन्सचा सुळसुळाट

रिझर्व्ह बँकेने व्यापारी बँका व एनबीएफसीजनी गोल्ड लोन्सबद्दलची आपली धोरणे व ती देण्याची प्रक्रिया यांचा फेरआढावा घेण्याची सार्थ सूचना केली आहे.

अमेरिका व चीन यांच्यातील व्यापारयुद्धामुळे जागतिक पातळीवर निर्माण झालेली अनिश्चितता आणि कमकुवत झालेला डॉलर यामुळे सोन्याच्या भावात तेजीची झळाळी आली आहे. दहा ग्रॅम सोने एक लाख रुपयांच्या वर जाऊन पोहोचले आहे! यंदाच्या वर्षात सोन्याच्या भावात प्रति दहा ग्रॅमला वीस हजार रुपये, म्हणजे २६ टक्के इतकी वाढ झाली आहे. चांदीचा भावही ९८ हजार रुपयांवर प्रति किलोला गेला आहे. जागतिक बाजारात सोन्याचा भाव प्रतिऔंस ३,३९७ डॉलर या उच्चांकी पातळीवर पोहोचला आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी फेडरल रिझर्व्हचे अध्यक्ष जेरोम पॉवेल यांची हकालपट्टी करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे डॉलरचे मूल्य तीन वर्षातील नीचांकी पातळीवर आले असून, सुरक्षित गुंतवणुकीचा पर्याय म्हणून लोक सोन्याकडे पाहात आहेत. शिवाय व्याजदरात कपात होण्याची अपेक्षा हाही एक घटक कारणीभूत ठरलेला आहे. सोन्याच्या भावातील तेजीमुळे, सोने तारण ठेवून मोठ्या प्रमाणावर कर्ज उचललले जात आहे. बँका आणि नॉन बँकिंग फायनान्स कंपन्या, म्हणजेच बिगर बँकिंग वित्तीय कंपन्या देखील प्रचंड प्रमाणात गोल्ड लोन देत असून, त्यामुळे त्यांच्या एनपीए, म्हणजेच थकित कर्जांमध्ये वाढ झाली आहे. गोल्ड लोन्सवरील एनपीएमध्ये २८ टक्क्यांची वाढ झाली असून, येणे कर्जांत २७ टक्क्यांची वाढ झाली आहे.

डिसेंबर २०२३ मध्ये या कर्जाची थकबाकी ५,३०७ होती, ती आता ६,८२४ कोटी रुपयांवर जाऊन पोहोचली आहे. या गोल्ड लोन्सच्या थकबाकीमध्ये व्यापारी बँकांचा वाटा सिंहाचा आहे. त्यांची ही थकित रक्कम २,०४० कोटी रुपये असून, वित्तीय कंपन्यांची ४,७८४ कोटी रुपये इतकी थकबाकी आहे. भविष्यात असेच घडत राहिल्यास, या बँका व कंपन्या संकटात येऊ शकतात.

बँकांनी आणि एनबीएफसीजनी ११ लाख ११ हजार कोटी रुपयांवर गोल्ड लोन्स दिलेली आहेत. हे प्रमाण मर्यादेबाहेर गेले असून, त्याबाबत केंद्रीय अर्थखात्याने देखील गंभीरपणे लक्ष घालण्याची गरज आहे. सोन्यावरील गहाणवट कर्ज देताना अनेकदा त्याचे चोख मूल्यांकन करावे लागते. सोने तारण म्हणून ठेवणार्या ग्राहकाला बाजूला ठेवून, ते मूल्यांकन केले जाते. कधी कधी तिसर्याच कुठल्यातरी कंपनीकडून कर्जाचे मूल्यमापन केले जाते.

गोल्ड लोनचा वापर कर्जदार कशाप्रकारे करत आहे, याची अनेकदा पाहणीच केली जात नाही. कर्ज फेडण्यात ऋणको अयशस्वी ठरला, तर ते सोने किंवा सुवर्णालंकार यांचा लिलाव केला जातो. परंतु तो देखील बर्याचदा पारदर्शकपणे केला जात नाही. या सर्व कर्जव्यवहारात जी जोखीम असते, त्याचे चिकित्सकपणे मूल्यांकन केले जात नाही, अशा तक्रारी आहेत. म्हणूनच रिझर्व्ह बँकेने व्यापारी बँका व एनबीएफसीजनी गोल्ड लोन्सबद्दलची आपली धोरणे व ती देण्याची प्रक्रिया यांचा फेरआढावा घेण्याची सार्थ सूचना केली आहे. याबाबत बाहेरील व्यक्तींची वा कंपन्यांची सल्ला-सेवा घेण्यात येणार असेल, तर त्यावर गोल्ड लोन देणार्या बँकेने अथवा एनबीएफसीने नियंत्रण ठेवले पाहिजे, अशी रिझर्व्ह बँकेने सूचना केली आहे. संबंधितांनी या सूचनेचे पालन केले पाहिजे.

यापूर्वी अनेक ऋणको ९ ते १२ टक्के व्याज बँकांना देऊन, गहाण ठेवलेले दागदागिने पुन्हा गहाण ठेवत असत. मूळ मुद्दलाची रक्कम न देता, येणे कर्जाच्या रकमेत त्यामुळे वाढ होत असे. गेल्या सप्टेंबरमध्ये रिझर्व्ह बँकेने या संदर्भात बँका व एनबीएफसीजना आदेश दिले. परिणामी आता जर सोने फेरगहाण ठेवायचे असेल, तर ऋणकोंना मुद्दलाची पूर्ण रक्कम आणि व्याज द्यावे लागते. त्यानंतरच कर्जाची मुदत वाढवण्याची विनंती करता येते. तसेच सोने-चांदी किंवा एक्स्चेंज क्रेडिट फंड वा म्युच्युअल फंडांच्या युनिट्सच्या आधारे कोणताही अॅडव्हान्स देण्यास रिझर्व्ह बँकेने मज्जाव केला आहे.

तसेच सोन्याच्या किमतीच्या ७५ टक्क्यांपेक्षा जास्त कर्ज देऊ नका, असेही बजावण्यात आले आहे. तसेच ऋणको जे सोने घेऊन बँकांकडे येतात, ते त्यांच्या मालकीचे आहे का, हेही पाहणे आवश्यक असते. सोने गहाण ठेवून कर्ज घेण्याची प्रवृत्ती का वाढली आहे याचे कारण म्हणजे, ती सहजपणे मिळतात. फारशा कागदपत्रांची आवश्यकता नसते. शिवाय हल्ली अनेकदा शेअर बाजार कोसळत असून, सोन्या-चांदीचा बाजार मात्र तेजीत असतो. त्यामुळे याचा फायदा घेण्यासाठी देखील सोने-चांदी तारणावर कर्ज घेण्याची प्रवृत्ती वाढलेली असावी. मुळात आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारताच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीची गती जानेवारी महिन्यातील अंदाजापेक्षा ३० आधारबिंदूंनी कमी केली आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षात आपला विकास ६.२ टक्के होईल, असा होरा आहे. ट्रम्प यांच्या व्यापारविषयक धोरणांमुळे जागतिक अर्थव्यवस्था विद्यमान वर्षात केवळ २.८ टक्के दराने वाढण्याची शक्यता आहे. याआधी जानेवारीमध्ये ३.३ टक्के विकासदर असेल, असे भाकित करण्यात आले होते.

एकूणच जगात नरमाई येणार आहे. त्यामुळे भारतातील रोजगारावर तसेच लोकांच्या मिळकतीवर विपरीत परिणाम होणार आहे, अशी भीती आहे. म्हणूनच सुरक्षिततेचा उपाय म्हणून लोक सोन्यात अधिकाधिक पैसे गुंतवत आहेत. त्याचप्रमाणे आपल्या गरजा भागवण्यासाठी सोन्याच्या तारणावर कर्ज उचलत आहेत. परंतु त्यात असलेले धोकेही विचारात घेण्याची गरज आहे.

पान १ वरून..

**नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होणार जूनपासून**

स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे.

प्रमुख मुद्दे

- मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी पहिलीच्या वर्गापासून हिंदी भाषा शिकणे अनिवार्य

- इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी नवीन अभ्यासक्रम जून २०२५ मध्ये लागू करण्यात येणार

- दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीचे नवे अभ्यासक्रम २०२६-२७ मध्ये लागू करण्यात येणार -पाचवी, सातवी, नववी आणि अकरावीतील नवे अभ्यासक्रम २०२७-२८ मध्ये मध्ये लागू करण्यात येणार- २०२८-२९ मध्ये आठवी, दहावी आणि बारावीचे अभ्यासक्रम नव्याने तयार केले जाणार आहे. - नवीन शिक्षणपद्धतीत एनसीईआरटीच्या धर्तीवर समग्र, मूल्य-आधारित आणि कौशल्य-आधारित शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. शाळेच्या वेळापत्रकात, विषय नियोजन, मूल्यांकन पद्धती आणि परीक्षेच्या वेळापत्रकात बदल करण्यात येणार आहे. राज्य सरकारने दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी ७५% उपस्थिती अनिवार्य केली आहे, हा निर्णय यापूर्वीच घेण्यात आला होता. संपूर्ण शैक्षणिक वर्षाचे नियोजनच्या मार्गदर्शनाखाली केले जाईल आणि शाळांना हे नियोजन जूनपूर्वी उपलब्ध करून दिले जाणार आहे.

एनसीईआरटी मॉडेलचे अनुसरण करून नवीन अभ्यासक्रम चौकट विकसित करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी शाळांना आवश्यक मार्गदर्शन आणि नियोजन कागदपत्रे प्रदान केली जातील. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीचा उद्देश राज्याच्या शिक्षण व्यवस्थेत एक महत्त्वपूर्ण परिवर्तन घडवून आणणे आहे, ज्यामध्ये समग्र विकास आणि कौशल्य निर्मितीवर लक्ष केंद्रित केले जाईल.

--------------------

**अमित शहांनी मुख्यमंत्र्यांना केलं सतर्क म्हणाले, एकही पाकिस्तानी..,**

आदेश देण्यात आले आहेत. यापार्श्वभूमीवर शहांनी मुख्यमंत्र्यांना अलर्ट केले आहे. भारताच्या या कारवाईनंतर पाकिस्ताननेही भारतीय नागरिकांचा व्हिसा रद्द करून त्यांना तातडीने देश सोडण्यास सांगितले आहे. त्याचप्रमाणे सिमला करार रद्द केला असून वाघा बॉर्डरही बंद केली आहे. भारतासोबतचा व्यापार बंद करण्याचा निर्णयही पाकिस्तानने घेतला आहे. त्यामुळे दोन्ही देशांमधील तणाव वाढत चालला आहे. त्याचे पडसाद दोन्ही देशांमध्ये उमटत आहेत.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरूवारी पहलगाम हल्ल्यावर पहिल्यांदाच सार्वजनिक कार्यक्रमात भाष्य केले. यावेळी बोलताना त्यांनी दहशतवाद्यांना त्यांनी कल्पनाही केली नसेल, अशी शिक्षा दिली जाईल, असा इशारा दिला आहे. हा दहशतवादी हल्ला पर्यटकांवरील नसून देशाच्या आत्म्यावरील हल्ला असल्याची भावनाही त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे यानंतरही भारताकडून पाकिस्तानला अद्दल घडविण्यासाठी मोठी पावले उचलली जाऊ शकतात.

---------------------------

**केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत बीड जिल्हा चमकला !**

बाब आहे. पुढील काळात देशातील सर्वसामान्य नागरीकांची सेवा तुमच्या हातून घडणार आहे. सामान्यांच्या समस्या आणि सेवेला प्राथमिकता देऊन आपण राष्ट्रनिर्मितीत भरीव योगदान द्याल हा विश्वास आहे. तुम्हा दोघांचेही पुनःश्च अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा ! अशा शब्दांत ना. पंकजाताई मुंडे यांनी अभिनंदन केले आहे.

--------------------

**देशातील हवामानात मोठा बदल**

राज्यांमध्ये पुढील दोन दिवस वादळी वा-यासह अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

बांगलादेश आणि आसाममध्ये कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे, त्यामुळे पूर्व भारतात वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह अतिमुसळधार पाऊस पडू शकतो असा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. आसाम, मेघालय, अरूणाचल प्रदेश, त्रिपुरा, मिझोरम, नागालँड, या राज्यांमध्ये पुढील सात दिवस जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच या राज्यांमध्ये वादळ देखील येवू शकते. या काळात ताशी ६० ते ७० किमी प्रति तास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे, या पार्श्वभूमीवर आयएमडीकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दक्षिण भारताला देखील पाऊस झोडपून काढणार आहे. दक्षिण भारतामध्ये तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, आध्र प्रदेश आणि पाँडेचेरी या राज्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दुसरीकडे बिहार, झारखंड, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालमध्ये देखील जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे, सिक्कीममध्ये अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.

महाराष्ट्रात उष्णतेचा तडाखा

महाराष्ट्रात मात्र उष्णतेचा तडाखा कायम राहणार आहे. आणखी काही दिवस महाराष्ट्रात उष्णतेची लाट पाहायला मिळणार आहे. राज्यात ब्रम्हपुरीमध्ये सर्वाधिक ४५.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर राज्याला हाय अलर्ट देण्यात आला आहे. तसेच काही दिवस ढगाळ हवामान राहण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

--------------------

**देशावर अनेक हल्ले मात्र धर्माची चर्चा आज का होतेय?-शरद पवार**

मला माहीत नाही. यात काय तथ्य आहे. माहीत नाही. जे प्रवासी होते, त्यात त्यांनी स्त्रियांना सोडलेले दिसत आहे. पुरुषांना गोळ्या घातल्या. पुण्यात दोघांचे मृत्यू झाले. त्यातील दोन लोकांच्या घरी मी गेलो होतो. घरी गेल्यावर त्या भगिनी तिथे होत्या. त्या मला सांगत होत्या. आम्हाला कुणालाही हात लावला नाही. आमच्या पुरुषांना गोळ्या घातल्या. लोकसभेतील नेत्यांना बोलावले होते. आमच्या पक्षाच्या सुप्रिया सुळे या लोकसभेच्या नेत्या आहेत. मी राज्यसभेचा आहे. त्यामुळे सुप्रिया सुळे गेल्या होत्या.

ही धर्माविरोधी लढाई?

पहेलगाम येथील हल्ला ही धर्माविरोधी लढाई वाटते का असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला होता. त्यावर शरद पवार यांनी अचूक टायमिंग साधले. ते म्हणाले यापूर्वीही अतिरेक्यांनी हल्ले केले. पुलवामात हल्ला केला. या आधी तीन चार ठिकाणी अतिरेक्यांनी हल्ला केला. तेव्हा धर्माची चर्चा झाली नाही. आज का होतेय. घडले ते वाईट आहे. आव्हान आहे देशाला. सक्तीने तोंड द्यावे लागेल. पण त्या निमित्ताने धार्मिक अडसर येण्याचे काम करू नये.

आम्ही सरकारसोबत

यावेळी त्यांनी केंद्र सरकारच्या दाव्याची पोलखोल केली. पहलगाम हे ठिकाण अधिक सेफ आहे. दोन तीन महिन्यांपूर्वी मी गेलो होतो. सातत्याने आपले लोक जातात. हे घडले ते पहलगामला घडले. याचा अर्थ दहशतवादी प्रवृत्तीविरूद्ध आपण यश मिळवले असा निष्कर्ष आपण काढत आहोत तर तो थोडा सावध काढला पाहिजे आणि काळजी घेतली पाहिजे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

दहशतवाद संपविला की नाही?

आम्ही दहशतवाद संपवला, आता काही चिंता नाही असे सांगितले जात होते, असा चिमटा त्यांनी काढला. पण ठीक आहे, उदाहरण पाहिले आपण याचा अर्थ कुठे ना कुठे तरी अजूनही कमतरता आहे. ती कमतरता घालवली पाहिजे. देशावर हल्ला झाला असेल, सरकार गांभीर्याने निर्णय घेत असेल आणि कमतरता आहे असं मान्य करत असेल तर तातडीने ती कमतरता काढली पाहिजे. त्याही कामात आम्हा लोकांचं सरकारला सहकार्य राहील, अशी भूमिका शरद पवार यांनी जाहीर केली.

--------------------

**छत्तीसगडमध्ये चकमक, ७ नक्षलवाद्यांचा खात्मा**

डोंगराळ भागात ही चकमक सुरू आहे. परिसरात सतत गोळीबाराचा आवाज ऐकू येत आहे. याच दरम्यान, एक आयईडी स्फोट झाला असल्याची माहितीही समोर आली. मोस्ट वॉन्टेड नक्षल कमांडर हिडमा आणि बटालियन प्रमुख देवा याच्यासह इतर महत्त्वाच्या नक्षल नेत्यांची हालचाल या भागात असल्याची माहिती सुरक्षा यंत्रणांना मिळाली होती. त्यानंतर व्यापक पातळीवर ही कारवाई सुरु करण्यात आली. कालपासून सुरू असलेली ही चकमक नडपल्लीच्या पहाडी परिसरात जोरात सुरू असून, सतत गोळीबाराचा आवाज कानावर येत आहे. ड्रोनच्या माध्यमातून चकमकीवर सुरक्षा दल सतत लक्ष ठेवून आहे.

१ हजार नक्षलवाद्यांना घेरले

या कारवाईत ३ राज्यांतील २० हजारांहून अधिक सुरक्षा दलाचे जवान सहभागी असून, सुमारे १ हजार नक्षलवाद्यांना घेरण्यात आले आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

# शेतकरी पुत्र अक्षय मुंडेंचे यूपीएससीतील यशानंतर गावात जल्लोषात स्वागत

बीड (प्रतिनिधी):- जिल्ह्यातील परळी तालुक्यातील पांगरी या छोट्याशा गावातील सामान्य शेतकरी कुटुंबातील सुपुत्र डॉ. अक्षय संभाजी मुंडे यांनी यूपीएससी परीक्षेत यश मिळवून गावाचे नाव उज्वल केले. २४ एप्रिल गुरुवारी रात्री त्यांचे पांगरी येथे आगमन झाल्यानंतर ग्रामस्थांनी भव्य मिरवणुकीद्वारे त्यांचे उत्साहात स्वागत केले. डॉ. मुंडे दिल्लीहून रात्री आठ वाजता पांगरीत पोहोचले. गावात आल्यावर त्यांनी सर्वप्रथम आपल्या आई इंदुबाई मुंडे आणि वडीलधाऱ्यांचे आशीर्वाद घेतले. त्यानंतर गोपीनाथ गडावर जाऊन लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या समाधीस्थळाला अभिवादन केले. गावकऱ्यांनी आपापसात वर्गणी गोळा करून त्यांच्या स्वागतासाठी मिरवणुकीचे आयोजन केले. गोपीनाथ गड ते पांगरी कॅम्पपर्यंत उघड्या जीपमधून ढोल-ताशांच्या गजरात आणि पुष्पवृष्टीत मिरवणूक काढण्यात आली. श्री हनुमान मंदिरात झालेल्या कार्यक्रमात त्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी व्यासपीठावर त्यांच्या आई इंदुबाई मुंडे उपस्थित होत्या. ड. श्रीनिवास मुंडे, ज्ञानोबा मुंडे पाटील, विनायक मुंडे, श्रीकांत तिडके, दत्तात्रय तिडके, महादेव मुंडे, सुमंत पांचांगे, माणिक मुंडे, किशन मुंडे, वसंतराव तिडके, गोविंद मुंडे, नंदकिशोर मुंडे, अभिमान मुंडे, डॉ. संतोष मुंडे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ, तरुण वर्ग उपस्थित होते. गावकऱ्यांच्या मदतीला सदैव तत्पर असेन गावकऱ्यांनी माझे जसे स्वागत केले, तसंच त्यांना गरज भासेल तेव्हा मीही त्यांच्या मदतीला तत्पर असेन, असे भावनिक उद्गार डॉ. अक्षय मुंडे यांनी काढले. त्यांनी सांगितले की, सहा प्रयत्नांनंतर स्वतःच्या मेहनतीवर हे यश संपादन केले. कोणत्याही कोचिंग क्लासशिवाय अभ्यास केला. आर्थिक अडचणींमुळे काही क्लासेसमध्ये बसता आलं नाही. तरीही प्रयत्न सुरू ठेवले. यशानंतर एका कोचिंग क्लासेसनी माझा फोटो लावला, पण मी त्यांना विनंती केली की फोटो काढा, कारण चुकीचा संदेश जाऊ नये, आणि स्वतःच्या अभ्यासावर विश्वास ठेवूनही यश मिळवता येते, असेही त्यांनी नमूद केले.

आईने शेतीत कष्ट करून मुलांना शिकवले

डॉ. अक्षय यांनी डेंटिस्ट म्हणून काही काळ सेवा केली आणि शिष्यवृत्ती मिळवून पुढील शिक्षण पूर्ण केले. आईने शेतीत कष्ट करून त्यांना शिकवले. त्यांच्या यशात बहिणी अक्षता हिचेही मोठे योगदान आहे. अक्षयने फोन करून 'आई, मी यूपीएससीत पास झालो' असे सांगितले, तेव्हा माझ्या डोळ्यातून आनंदाश्रू आले, असे इंदुबाई मुंडे भावूकपणे म्हणाल्या. पांगरी गावाचा डॉ. अक्षयमुळे अभिमान वाढला आहे, असे मत ड. श्रीनिवास मुंडे यांनी व्यक्त केले.





**संगमनेर येथील सिद्धकला आयुर्वेद महाविद्यालयाच्या बी.ए.एम.एस.पदवीदान समारंभात आष्टी जि.बीड येथील कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन यांचे द्वितीय चिरंजीव डॉ.सय्यद वलीयुद्दीन हे संस्थाप्रमुख डॉ.नैमिष सराफ,प्रमुख अतिथी,मार्गदर्शक डॉ.रामदास आव्हाड आणि प्राचार्य डॉ.खाडे यांच्या हस्ते सन्मानपूर्वक वैद्यकीय पदवी स्वीकारताना.**

# व्याकरणाच्या अध्ययनातून भाषेवर प्रभुत्व निर्माण करता येते-प्रा. दत्तात्रय आसवले

किल्ले धारूर (प्रतिनिधी):- येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयांमध्ये प्रा. दत्तात्रय आसवले यांचे स्पर्धा परीक्षा आणि मराठी व्याकरण या विषयावर ऑनलाईन झूम पद्वारे अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी आपल्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना मराठी व्याकरणाचे स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले स्वरूप सविस्तर सांगितले. मराठी व्याकरण व्यवस्थित अवगत केल्यास व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूंचा विकास होण्यास मदत होते. व्याकरणाच्या अध्ययनातून भाषेवर प्रभुत्व निर्माण करता येते असे प्रतिपादन केले. अधिकाधिक विद्यार्थ्यांनी पदवीनंतर स्पर्धा परीक्षांकडे वळले पाहिजे. नियोजन व सूत्रबद्ध अभ्यास पद्धतीतून स्पर्धा परीक्षांत यशस्वी व्हावे असे सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपातून उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे मराठी व्याकरण स्पर्धा परीक्षेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. मराठी व्याकरणास या परीक्षेत अनन्यसाधारण महत्त्व असून मराठी व्याकरण यामुळे लेखन, वाचन आणि संवाद कौशल्य प्रगत होते. या व्याख्यानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व उपस्थितांना व्याकरणाच्या उपयोजनाविषयी लहान सहान गोष्टींची माहिती झाली असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. विठ्ठल केदारे यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाच्या आयोजन मागील भूमिका सांगितली. ऑनलाइन व्याख्यानासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी वर्ग व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विठ्ठल केदारी यांनी तर आभार डॉ. बाबासाहेब जाधव यांनी व्यक्त केले.



# खळबळजनक ! आ. खोतकरांसह मुलाला जीवे मारण्याची धमकी

जालना : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार अर्जुन खोतकर आणि त्यांचे पुत्र अभिमन्यू खोतकर यांना सोशल मीडिया वरून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. या संदर्भात अभिमन्यू खोतकर यांनी केलेल्या तक्रारीवरून जालना तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आहे. तसेच अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

अधिक माहितीनुसार वेगवेगळे इन्स्टाग्राम अकाउंट वापरुन आमदार अर्जुन खोतकर आणि त्यांचे पुत्र अभिमन्यू खोतकर यांच्याविरुद्ध अश्लील शिवीगाळ करत त्यांना गोळ्या घालून जिवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. या घटनेमुळे जालना जिल्ह्यामध्ये एकच खळबळ उडाली आहे. या घटनेमध्ये वापरण्यात आलेल्या संबंधित इन्स्टाग्राम अकाउंटची सखोल चौकशी पोलिसांकडून करण्यात येत आहे. तसेच या अज्ञात व्यक्तीचा शोध देखील पोलिसांच्या वतीने सुरू करण्यात आला असल्याची माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी दिली आहे.



# आदित्य दिलीप जाधवने पटकावले रौप्यपदक रौप्यपदक जिंकून वाढविला महाराष्ट्राचा गौरव..!

अंबाजोगाई (प्रतिनिधी):- राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत ग्रीको-रोमन कुस्तीच्या ४८ किलो वजनी गटात अंबाजोगाईच्या कै.वसंतराव नाईक प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, आनंदनगर येथील इयत्ता ९ वी वर्गातील विद्यार्थी खेळाडू आदित्य दिलीप जाधव याने ऐतिहासिक कामगिरी करीत रौप्यपदक पटकावून शाळा, जिल्हा आणि महाराष्ट्राचा गौरव वाढविला आहे.

छत्रसाल स्टेडियम, दिल्ली येथे मंगळवार, दिनांक २२ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत आदित्यने दाखविलेल्या शौर्य, तंत्रनिपुणता आणि अखंड संघर्षाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. हा अंबाजोगाईच्या कै.वसंतराव नाईक प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा - समुदायासाठी अभिमानाचा क्षण आहे. आदित्यच्या यशाने आश्रमशाळेच्या प्रांगणात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळेचे संस्थापक सचिव अनिल रामधन राठोड यांनी आदित्यच्या पराक्रमाला 'आमच्या शैक्षणिक आणि क्रीडा उपक्रमांच्या समन्वयाचे प्रतीक' असे संबोधले. 'आदित्यने केवळ स्वतःसाठी नव्हे, तर शाळेच्या ३० वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच राष्ट्रीय पातळीवर कुस्तीत पदक मिळवून खेळाडूंसाठी नवा उत्साह निर्माण केला आहे,' असे शुभेच्छा संदेशात म्हणाले. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक एस.आर.राठोड, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक एस.ए.राठोड व क्रीडा शिक्षक प्रविण उत्तमराव ठोंबरे, जि.एस.राठोड व बी.बी.राठोड यांनी त्याच्या अथक परिश्रमाचा गौरव करताना सांगितले की, त्याने दररोज ५ तासांच्या प्रशिक्षणात अलौकिक निष्ठा दाखविली. त्याच्या यशामागे 'न करता येणारे काहीच नाही' हा दृष्टिकोन आहे.' गरिबीतून उद्याचा 'चँपियन' आदित्यचा प्रवास संघर्षांनी भरलेला आहे. अंबाजोगाईच्या एका सामान्य मजुराच्या कुटुंबात जन्मलेल्या आदित्यने लहानपणापासून कुस्तीचे आकर्षण अनुभवले. वडील दिलीप भीमराव जाधव यांच्या परिश्रमाने त्याला राष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करण्याची संधी मिळाली. 'माझ्या आई-वडिलांनी माझ्या स्वप्नांना पंख दिले. या पदकाचे श्रेय त्यांनाच आहे,' असे आदित्यने भावपूर्ण शब्दांत सांगितले. आदित्यच्या या यश बद्दल संस्थेचे सचिव, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी आदित्यचे अभिनंदन करून त्याला शुभेच्छा दिल्या. याबाबत मान्यवरांनी शुभेच्छापर प्रतिक्रिया देताना सांगितले की, '(ग्रिको रोमन) कुस्ती खेळात आदित्यच्या यशाने समाजातील युवकांना नवीन दिशा दाखविली आहे. मागासवर्गाच्या सक्षमीकरणासाठी हा क्षण ऐतिहासिक आहे. आदित्यचे अभिनंदन असे जलील शेख (प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक विभाग), छत्रपती संभाजीनगर.) म्हणाले. तर 'या पदकाने केवळ आदित्यचाच नव्हे, तर आश्रमशाळा आणि इतर मागास बहुजन कल्याण विभागाचा गौरव वाढला आहे. आदित्यचे यश आश्रमशाळेतील इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. असे डी.बी.क्षीरसागर (सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय. बीड.) यांनी सांगितले. 'कै.वसंतराव नाईक आश्रमशाळेने शिक्षण पद्धतीने केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे, तर क्रीडा - कौशल्याचीही जोपासना केली आहे, हे आदित्यच्या यशाने सिद्ध झाले. आदित्यला भावी वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा व्यक्त करताना शेख चाँद (गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, अंबाजोगाई.) म्हणाले. तर 'एखाद्या खेळाडूची खरी योग्यता ही त्याच्या स्पर्धात्मक भावनेत असते. आदित्यच्या खेळातील तीच भावना पाहून आम्हाला विश्वास वाटतो की,आदित्य पुढील वर्षी सुवर्णपदक घेऊन येईल असा विश्वास अरविंद विद्यागर (जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड.) यांनी व्यक्त केला. यावेळी आदित्य जाधवचे अभिनंदन करून त्याच्या यशामध्ये सरावातील सातत्य व त्याचे क्रीडा मार्गदर्शक प्रविण ठोंबरे सर व जि.एस.राठोड सर यांचे दररोजचे मार्गदर्शन व त्याच्या अथक परिश्रमातून हे यश त्याला लाभलेले आहे, आदित्यचे हे यश केवळ शाळेसाठी प्रेरणादायी नसून, अंबाजोगाई तालुक्यासह बीड जिल्ह्यातील खेळाडूंसाठी प्रेरणादायी आहे.




# माजलगाव वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड.मनसबदार



माजलगाव (प्रतिनिधी):- माजलगाव वकील संघाची वार्षिक निवडणुक २०२५/२६ करीता निवडणुक प्रक्रियेस दि.१६ एप्रिल पासून सुरुवात झाली असून.अध्यक्ष पदासाठी ४ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते.दि.२४ रोजी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख असल्याने ३ उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने वकिल संघाच्या अध्यक्ष पदी ॲड.कजिम मनसबदार (सिद्दीकी) यांची बिनविरोध निवड करण्यात आली.तर उपाध्यक्ष व सचिव पदासाठी दि.२८ रोजी मतदान असणार आहे.ॲड.मनसबदार यांची निवड झाल्याबद्दल त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी वकिल संघाचे सिनियर ॲड .बि. आर. डक,ॲड.व्ही.व्ही. फपाळ, ॲड.एस.ए.सुतळे, ॲड.टि.एन. कोल्हे,ॲड.ए.डी. घाडगे, ॲड.पी.पी.गोंडे,ॲड.विजय मस्के यांच्यासह आदी उपस्थित होते.



**बीड : बीड नुतन जिल्हाधिकारी म्हणून आज विवेक जॉन्सन सर यांनी पदभार स्वीकारला. यावेळी त्यांचा समाजसेवक प्रविण भाऊ पालीमकर, महेश मते,अशोक दादा ढोले पाटील, रामदास कोटुळे, हारीदास कोटुळे ,संदिप गांडगे, नारायण कोटुळे, प्रकाश तावरे, ईश्वर आंमटे, व सातिराम आणा ढोले पाटील सामाजिक फाउंडेशन महाराष्ट्र राज्य बीड वतीने सत्कार करुन शुभेच्छा दिल्या.**

## प्राथमिक शिक्षक वानोळे यांचा पालकांनी केला सत्कार

# पहिलीचा १०० टक्के निकाल, ६ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत चमकले

पाटोदा (प्रतिनिधी):- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाटोदा येथील ११ विद्यार्थ्यांनी आयएएस श्रेया इंटेलिजंट स्पर्धा २३ फेब्रुवारी रोजी दिली होती. १३ एप्रिल रोजी निकाल जाहीर झाला असून ११ पैकी ११ विद्यार्थी उत्तीर्ण होत १०० टक्के निकाल लागला असून २३ फेब्रुवारी रोजी राज्यस्तरीय गुणवत्ता यादी जाहीर झाली असून ११ पैकी ६ विद्यार्थी राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत चमकले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना घडवणारे तथा परीक्षेत बसण्यास प्रेरित करणारे, त्यांची संपूर्ण तयारी करून घेणारे प्राथमिक शिक्षक तथा पहिलीचे वर्गशिक्षक गंगाधर वानोळे यांचा २५ एप्रिल रोजी ग्रामस्थांनी शाळेत येऊन सत्कार केला. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डी.एस.मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे सदस्य जीवनराव वायाळ, गुणाजी नजान, मारोती जोशी, मनिषा जोशी, बाळासाहेब परभने, योगेश बोराडे, गजानन चव्हाळ, दत्तात्रय गोरे, सुदाम डोळझाके, एकनाथ घोंगडे, नामदेव बोराडे आदी पालकांनी गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार केला. इयत्ता पहिलीच्या रुद्रांश मारोती जोशी (९), सौरभ गुणाजी नजान (९), विठ्ठल सुदाम डोळझाके (१६), अनंता गजानन चव्हाळ (१९), सोहम सुरेशराव काळे (२५), अक्षरा बाळासाहेब परभने (३१) या क्रमांकाने राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत आले आहेत. यातील ३ विद्यार्थी सुवर्ण पदकासाठी तर इतर ३ विद्यार्थी रौप्य पदकासाठी पात्र ठरले असून विद्यार्थ्यांसह पहिलीचे वर्गशिक्षक गंगाधर वानोळे यांचाही शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य आणि पालकांनी गौरवार्थ सत्कार केला.



# पहलगाम येथील भ्याड अतिरेकी हल्ल्याच्या निषेधार्थ लिंबागणेश येथे निदर्शने




बीड (प्रतिनिधी):- जम्मू -काश्मिरच्या पहलगाम मधील ''मिनी स्वित्झर्लंड'' म्हणून ओळखले जाणारे '' बैसरण खोरे'' येथील निसर्गरम्य परिसरात पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांवर पाक धार्जिणे अतिरेक्यांनी बेछुटपणे गोळीबार करत हल्ला केला.या भ्याड हल्ल्यात २८ पर्यटक मृत्युमुखी पडले असुन अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. या हल्ल्यानंतर देशभर पाकिस्तान विरोधात संतापाची लाट उसळली असून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२४ गुरुवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे भ्याड अतिरेकी हल्ल्याच्या निषेधार्थ निदर्शने करण्यात आली.यावेळी हिंदू -मुस्लिम भाई भाई म्हणत ''पाकिस्तान मुर्दाबाद'' हल्लेखोरांना फाशी द्या '' पाकिस्तान विरोधी घोषणाबाजी करण्यात आली. हल्लेखोर आणि त्यामागील सुत्रधार यांना तातडीने अटक करून फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी , पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री, राज्यपाल, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना करण्यात आली. भारत सरकारने पाकिस्तान विरोधात घेतलेल्या सिंधू पाणी वाटप करार रद्द,अटारी सिमेवरील तपास नाका बंद, पाकिस्तानी नागरीकांना व्हिसा नाही, उच्चायुक्तालयातील लष्कर, नौदल आणि हवाई सल्लागार पदे रिक्त आदी निर्णयांचे स्वागत करण्यात आले.यावेळी आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, अँड . गणेश वाणी,अशोकराजे वाणी ,महादेव कुदळे,शेख शफीभाऊ, समीर शेख,कैलास काटे, बालाजी निर्मळ,शंकर निर्मळ, हरिओम क्षीरसागर, सुरेश निर्मळ,कचरू रणखांब, अमोल वक्ते, भगवान मोरे,आश्रुबा गिरे, संतोष भोसले, नाना वाणी, जनार्दन वाणी, राजेंद्र वायभट आदी ग्रामस्थ सहभागी होते.

## सकाळच्या वेळी फिरायला गेलेल्या अपघाताने दुर्दैवी मृत्यू



केज (प्रतिनिधी):- दिनांक २४ एप्रिल २०२५ वार गुरुवार या रोजी सकाळीफिरायला गेलेल्या इसमाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.याबाबत सविस्तर माहिती अशी की,सकाळच्या वेळी फिरायला जाऊनपरत येत असताना धारूर चौकात भास्कर दासराव हजारे राहणार भीमनगर केज यांचा अपघात झाला या अपघातात त्यांना गंभीर इजा झाली त्यांना तात्काळ स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय रुग्णालय अंबाजोगाई याठिकाणी घेऊन जाण्यात आले परंतु दुर्दैवाने त्या ठिकाणी उपचार चालू असतानाच त्यांची प्राणज्योत मावळली. या घटनेची माहिती मिळताच परिसरात शोककळा पसरली आहे.दरम्यान केज शहरात सकाळी किंवा सायंकाळी फिरायला जाण्यासाठी सुरक्षित जागा नसल्याने नाविलाजाने मुख्य रस्त्यावरच फिरायला जावे लागते त्यामुळे अपघात घडत आहेत. यासाठी नगर पंचायतने पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी नागरिकांच्या वतीने करण्यात येत आहे.

## पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बीड तालुका काँग्रेस पक्षाकडून तीव्र निषेध- गणेश बजगुडे



बीड (प्रतिनिधी):- काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बीड तालुका काँग्रेस व शिवक्रांती युवा परिषदेच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करत हा हल्ला अतिशय भ्याड व मानवतेला काळीमा फासणारा असुन हल्लेखोरांवर तत्काळ कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी काँग्रेसचे नेते व शिवक्रांती युवा परिषदेचे संस्थापक अध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी केले आहे. काश्मीर येथील पहलगाम येथे पाकिस्तानी दहशतवाद्यांनी २७ निरपराध भारतीय पर्यटकांवर गोळ्या झाडून हत्या केली. ही घटना अतिशय निंदनीय व मानवतेला काळीमा फासणारी असुन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी, गृहमंत्री अमित शहा यांनी यावर कठोरात कठोर भुमिका घेवुन ठोस उपाय योजना करायला हव्यात. जातीय धार्मिक तेढ निर्माण करून भ्याड हल्ले करणाऱ्यांवर सरकारने कारवाई तर करावीच परंतु देशाच्या सुरक्षिततेसाठी उपाय योजना देखील करायला हव्यात. या दहशतवादी हल्ल्यात मरण पावलेल्या सर्व भारतीयांना बीड तालुका काँग्रेस कमिटी व शिवक्रांती युवा परिषदेच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करत त्यांच्या कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्याचे बळ परमेश्वर देवो असेही गणेश बजगुडे पाटील यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

## दिव्यांगाच्या कागदपत्राची घरीच होणार पडताळणी

बीड (प्रतिनिधी): दिव्यांग निराधार व विविध योजनेतील लाभार्थ्यांना अपंगत्वामुळे हालचाल करता येत नसेल किंवा तहसील कार्यालयात येता येत नसेल तर अशा लाभार्थ्यांच्या कागदपत्राची (डीबीटी) आता घरीच पडताळणी होणार असून या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार सुहास हजारे यांनी केले आहे.

संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजना, दिव्यांग लाभार्थी अतिवृद्ध व्यक्ती, असतील ज्यांना हालचाल करणे अशक्य आहे व जे तहसील कार्यालय किंवा डीबीटी कॅम्प साठी येऊ शकत नाहीत. त्यांचे आधार कार्ड, राशन कार्ड , बँक पासबुक आणि मोबाईल नंबर हा ८१४९४६८८८४ या मो. नंबर वर व्हाट्सअप ला कळवा अथवा सज्जाचे ग्राम महसूल अधिकारी तथा तलाठी व मंडळ अधिकारी यांचे मार्फत तहसीलदार कळवावे,



त्यांची (डीबीटी) कागदपत्राची पडताळणी घरबसल्या करून घेतली जाईल. त्यामुळे मित्र, नातलग, परिचित, शेजारी व तालुक्यातील सर्व नागरिकांना हा मेसेज कळवावा असे आवाहन तहसीलदार सुहास हजारे यांनी केले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज पुतळानजीक सलोख्याची मेणबत्ती

बीड (प्रतिनिधी):- पहलगाम च्या हल्ल्यात सत्ताविस निष्पाप लोकांचा बळी घेऊन दहशतवादी देशाच्या एकात्मितेला व काश्मीर मधील रोजगाराला बाधा पोहोचवत आहेत आणि यासाठी त्यांनी जो रक्तपात केला त्या विरोधात देशएकवटला आहे आतंकी हल्ल्याच्या विरोधातदेशातला मुस्लिम समोर आला असून हीइस्लाम ची शिकवण नसल्याचे सांगत आहेतकुठला माथेफिरू इस्लाम चा चेहरा नाही तर देशभर रस्त्यावर उतरलेला मुस्लिम हा इस्लाम आहे त्यामुळे दहशतवादी जाणीवपूर्वक धर्म विचारून जे धर्मकारण करून गेला त्याच वक्तव्याचे काही लोक राजकारण करत आहेत. मात्र ही वेळ आपसात वाद वाढवण्याची नाही तर तर एकहोऊन आतंकी शक्ती व विचारांना विरोध करण्याचीअसल्याचे म्हटले गेले व हाच विचार घेऊनबीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळानजीक सलोख्याची मेणबत्ती घेऊन सामाजिककार्यकर्ते एकवटले व आम्ही एक आहोत आणिअसू असे म्हटले. दुर्दैवी निष्पाप जीवाना श्रद्धांजलीअर्पण करत शेवटी राष्ट्रगीत म्हणत या उपक्रमाचीसांगता झाली.यावेळी आनंदग्राम चे दत्ता भाऊ बारगजे,शेख शफिक भाऊ ,खुर्शीद आलम, सी ए बीबी जाधव, संपादक शेख कामरान , शायर व सहाय्यक स्तरावरून मोबाईल ॲप द्वारे पिकाची नोंदणी करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने खालील प्रमाणे कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे.

शेतकरी स्तरावरील ई पिक पाहणी उन्हाळी हंगाम कालावधी १ एप्रिल २०२५ ते १५ मे २०२५. सहाय्यक स्तरावरील ई पिक पाहणी उन्हाळी हंगाम कालावधी १६ मे २०२५ ते २९ जुन २०२५ उन्हाळी हंगाम २०२५ ची १०० टक्के ई पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्वे (उड) मोबाईल ॲप द्वारे पूर्ण करावयाची आहे. दिनांक २२. ४. २०२५ च्या दैनिक अहवालाच्या अवलोकन केले असता ०.०८ टक्के क्षेत्राची पीक नोंदणी झाल्याचे दिसून येते. त्या अनुषंगाने दिलेल्या सूचनाप्रमाणे तात्काळ कार्यवाही करून उन्हाळी हंगाम २०२५ ची शेतकरी व सहाय्यक स्तरावरील ई पिक पाहणी डिजिटल क्रॉप सर्व (उड) मोबाईल ॲप द्वारे विहित कालावधी १०० टक्के पूर्ण करण्याची दक्षता घ्यावी अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी दिल्या आहेत.

## बसचा प्रवास सुखाचा प्रवास - आमदार प्रकाश सोळंके

### – माजलगाव आगारात पाच नविन बसेस दाखल

माजलगाव (प्रतिनिधी):- सर्वसामान्यांसह सर्वांसाठीच बसचा प्रवास सुखाचा प्रवास असल्याचे प्रतिपादन माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी व्यक्त केले. येथील आगारात पाच नविन बसेस दाखल झाल्या असुन या बसेसच्या पुजन कार्यक्रमात आमदार सोळंके आज दि. २४ एप्रिल रोजी बोलत होते.



यावेळी आमदार प्रकाश सोळंके यांच्या हस्ते विधीवत पुजा करून माजलगाव आगारात पाच नविन बसेस प्रवाशांच्या सेवेत दाखल झाल्या. कार्यक्रमास कल्याण आबुज, तुकाराम येवले, उमेश मोगरेकर, कमलेश जाब्रस, आगारप्रमुख सु. दि. कोळपकर, स्थानक प्रमुख शैलेश जोशी, संदीप पेठे, श्रीमती बिलोलीकर, शकील कुरेशी, अथर सिद्दीकी, अझर सिद्दीकी, अमोल निर्मळ, अभिमान उजगरे, महादेव कोल्हे, रामेश्वर चव्हाण, शंकर औटे, आबा सोळंके, अभय दळवी, भास्कर काळे यांचेसह आगारातील कर्मचारी बांधव उपस्थित होते.

## मध्यप्रदेश आणि मुंबईतील घटनेचा जैन बांधवांकडून जाहीर निषेध

बीड (प्रतिनिधी):- : मध्यप्रदेश आणि मुंबईतील घटनेचा बीडमधील जैन बांधवांकडून जाहीर निषेध करण्यात आला आहे. त्याअनुषंगानेच मध्यप्रदेश येथे जैन मुनींना मारहाण केलेल्या आरोपींवर आणि मुंबई येथील जैन मंदिर पाडणार्या अधिकार्यांवर कडक कारवाई करा तसेच पाडलेले मंदिर पुन्हा उभे करा, अशी मागणी बीडमधील जैन बांधवांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यामार्फत शासनाकडे केली आहे. मध्यप्रदेश येथे जैन मुनींना झालेल्या मारहाणीचा व मुंबई विलेपार्ले येथील जैन मंदिर महापालिकेने पाडलेल्या घटनेचा बीडमधील जैन बांधवांकडून जाहीर निषेध करण्यात आला आहे. या दोन्ही घटना जैन समुदायासाठी अत्यंत खेदजनक आहेत. त्याअनुषंगानेच मध्यप्रदेश येथे जैन मुनींना मारहाण केलेल्या आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, तसेच मुंबई महापालिका अधिकार्यांनी विलेपार्ले येथील ३० वर्षांपुर्वीचे जैन मंदिर पाडून तेथील मंदिरातील मुर्तींची विटंबना केली आहे, सदरील विटंबना करण्यात येणार्या सर्व



अधिकार्यांना निलंबित करावे, त्यांची चौकशी करून त्यांना बडतर्फ करावे, महाराष्ट्र शासनाने ही बाब गंभीरतेने घ्यावी, तसेच तेथील जैन मंदिर पुन्हा उभारण्यासाठी शासनाने कार्यवाही करावी, अशी मागणी श्री. ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फ्रेस आणि सकल जैन समाज बीडच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना गुरूवारी लेखी स्वरूपात निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनावर दै. लोकाशाचे संपादक विजयराज बंब, अशोक लोढा, ललित अब्बड, मदन दुग्गड, सुशिल खिवंसरा, चेतन अब्बड, गौतम खटोड, अनिल काला, आशिष जैन, उज्वल कोटेचा, किशोर पगारीया, सुभाष जैन, संजय जैन, नरेंद्र महाजन, सतिष कोटेचा.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक संजय रघुनाथ हांगे यांनी ओम ऑफसेट, क्रांतीनगर, तहसीलच्या मागे, डी.पी.रोड बीड, ता.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक साप्ताहिक अक्षर वार्ता कार्यालय,क्रांतीनगर, तहसील कार्यालयाच्या मागे, डी.पी.रोड, बीड ता.जि.बीड पिन -४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले आहे. संपादक : संजय रघुनाथ हांगे,मो.९७६६२६८४१५ Email : aksharwartanews@gmail.com

The Newspaper Printed, Published and Owend by SANJAY RAGHUNATH HANGE and Printed at OM OFFSET, Kranti Nagar, Behind Tahasil Office, D.P. Road, Tq, Dist. Beed 431122 (Maharashtra) and published at office Of DALY SAPTAHIK AKSHAR VARTA , Kranti Nagar, Behind Tahasil Office, D.P. Road, Tq, Dist. Beed 431122 (Maharashtra) Editor : SANJAY RAGHUNATH HANGE Mo : 9766268415